# पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर,वसई-विरार

सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७

Phone No.022-29451003,

Email ID- cpoffice.mbvv@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/मिभावvि/आस्था-1/001-25/कौ.चा.अं.यादी/ 87 /2026 दिनांक :-05 /04/2026

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस शिपाई भरती सन 2024-25

### -: चालक पोलीस शिपाई पदाचे कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी :-

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयाच्या आस्थापनेवरिल सन 2024-2025 करिता रिक्त असलेल्या 81 चालक पोलीस शिपाई पदाची शारिरीक चाचणी व मैदानी चाचणी दिनांक-11/03/2026 ते दिनांक-25/03/2026 रोजीपर्यत आयोजित करण्यात आलेली होती. सदर शारिरीक चाचणी व मैदाणी चाचणी पुर्ण झाल्यानंतर, शारिरीक व मैदानी चाचणीकरिता हजर असलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शारिरीक मोजमापात पात्र ठरले आहेत, अशा उमेदरवारांचे मैदाणी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांची चेस्ट क्रमांकानुसार एकत्रित तात्पुरती यादी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात दिनांक- 28/03/2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तद्नंतर, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडिल दिनांक- 19/01/2026 रोजी निर्गमीत करण्यात आलेली पोलीस शिपाई आणि चालक पोलीस शिपाई आदी पदांची भरती प्रक्रिया कार्यपद्धती व तद्अनुषंगाने दि. 02/03/2026 रोजी केलेल्या सुधारणेनुसार मैदानी चाचणीत किमान 50% त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार पदांच्या 1:15 प्रमाणात कौशल्य चाचणीसाठी पात्र उमेदवारांची कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तयार करण्यात आलेली यादी दिनांक- 01/04/2026 रोजी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर यादीबाबत उमेदवारांच्या प्राप्त हरकती/आक्षेपांचे निरसन करण्यात आलेले असुन, कौशल्य चाचणीसाठी पात्र झालेल्या उमेदवाराची यादी अंतिम करण्यात येत असुन, सदर यादी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तयार करण्यात आलेली करण्यात आलेली आहे. सदर यादी यासोबत संलग्न करुन या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर अंतिम यादी प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवारांना कोणताही दावा/ हरकती/ तक्रार करता येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीसाठी पात्र उमेदवारांना कौशल्य चाचणीसाठीचे ठिकाण, वेळापत्रक व इतर सूचना या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सर्व पात्र उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**दिनांक:- 05/04/2026**
**ठिकाणी:- मिरा-भाईंदर, वसई-विरार**

05/04/26

( दत्तात्रय शिंदे )
**अपर पोलीस आयुक्त,**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार**